जगभर

# कॅनडा, दक्षिण आफ्रिका

## चन्द्रशेखर पुरन्दरे

**कॅनडा**

यावर्षीच्या मे महिन्यामध्ये कॅनडातील ब्रिटिश कोलंबिया राज्यात एका शाळेच्या आवारात पुरलेल्या मुलांचे २१५ सांगाडे सापडले. थडग्यावर असतात तसे खुणेचे दगडही तेथे नव्हते. नंतर काही आठवड्यातच सास्काचेवान नावाच्या दुसऱ्या राज्यात ७५१ मुले अशीच पुरलेली सापडली. बहुतेक सगळी कॅनडातील आदिम वंशाची मुले. आदिम म्हणजे गोरे वसाहतवादी येण्याआधीचे कॅनडाचे रहिवासी.

**पार्श्वभूमी**

कॅनडामध्ये लोकसंख्येच्या जवळजवळ ५ टक्के तेथील आदिम रहिवासी आहेत. एकूण देशात १६ ते २१ लाख. गोऱ्यांचे राज्य [१८६७ ला] आल्यावर त्यांनी त्यांना खुपणाऱ्या आदिम लोकांना नेस्तनाबूत करण्याचा प्रयत्न सुरू केला. या धोरणाचा भाग म्हणून रोमन कॅथॉलिक चर्च, प्रॉटेस्टंट चर्च व राजसत्ता यांनी या जनतेच्या मुलांना सक्तीने चर्चच्या निवासी शाळांत भरती केले. हेतू हा की पुढच्या पिढीचे मुख्य प्रवाहात [म्हणजे गोऱ्यांच्यात] अभिसरण व्हावे. त्यांची विचारसरणी, जीवनशैली गोऱ्यांसासारखी व्हावी. त्यासाठी देशात काहीशे एकर जमिनीवर अनेक शाळा व वसतिगृहे उभारण्यात आली. १८८०च्या दशकात या शाळा सुरू झाल्या. शेवटची शाळा १९९८ला बंद करण्यात आली. या आदिम लोकांना [चुकीने] Indian असे संबोधले जाते. त्यांच्यातील 'Indian' नष्ट करणे हे या शाळांचे ध्येय होते. त्यासाठी त्यांची संस्कृती नाकारण्यात आली. शाळेत जबरदस्तीने भरती केलेल्या व तेथेच राहायला लागणाऱ्या मुलांची आई-वडिलांपासून, नातेवाईकांपासून ताटातूट झाली. त्यांना त्यांची भाषा शाळेत बोलायला बंदी होती. त्यांचे धर्मांतरण करण्यात आले, त्यांना नवी नवे देण्यात आली, त्यांच्या संस्कारानुसार त्यांनी वागणे अमान्य होते. थोडक्यात त्यांची अस्मिताच नाकारण्यात आली. त्यांचे संस्करण पाश्चात्त्य गोऱ्या संस्कृतीनुसार होईल याची खबरदारी चर्च घेत असे. देशभरच्या अशा दीडशे शाळांमध्ये सुमारे दीड लाख मुले होती. या संस्था १२० वर्षे चालल्या म्हणजे आदिम लोकांच्या अनेक पिढ्या त्यातून गेल्या.

**हिंसाचार**

हे 'शिक्षण' फक्त धर्म/संस्कृती अशा श्रद्धाविषयक परिवर्तनापर्यंत थांबले नाही. मुलांवर कमालीचे मानसिक, शारीरिक, लैंगिक अत्याचार झाले, त्यांची मारहाण, उपासमार झाली. भयानक म्हणजे, मुलांचे खूनही सर्रास करण्यात आले. त्यांची शवे शाळेच्याच आवारात पुरण्यात आली. ती आता सापडत आहेत. शाळेच्या कर्मचाऱ्यांच्या, धर्मगुरूंच्या बलात्कारातून ज्या मुली गर्भार राहिल्या, त्यांचे गर्भपात करण्यात आले. प्रसंगी हे गर्भ जाळण्यात आले. शाळा नसून ते कत्तलखाने झाले होते. मुलांच्या आई-वडिलांना मुलाचा मृत्यू झाला हे कळवण्याची तसदीही शाळेने प्रत्येक वेळी घेतली नाही. त्यामुळे पालकांच्या मानसिक यातना वाढल्या. हा प्रकार एखाद-दुसरा, तुरळक नव्हता. तो व्यवस्थात्मक होता आणि पिढ्यानपिढ्या चालला. त्याविरुद्ध हे लोक तळमळत राहिले कारण ना दाद ना फिर्याद. त्यांचा 'गुन्हा' म्हणजे यस्मिन्कुले त्वमुत्पन्नो... आजच्या त्या लोकांच्या मते ते जे सांगत आले आहेत, त्याला अशा पुराव्यांची जरूरीच नव्हती. कोणाच्या तरी वर्गातील मुलगा अचानक गायब झाला, कोणीतरी मुले असल्या शाळेतून पळून जाण्याचा प्रयत्न करताना ठार मारली गेली, या गोष्टी त्यांनी प्रत्यक्ष अनुभवल्या आहेत.

**TRC**

या मौखिक इतिहासाची दखल घेऊन जून २००८ ला कॅनडा सरकारने या सगळ्या प्रकाराची चौकशी करण्यासाठी Truth and Reconciliation Commission [TRC] स्थापन केले. उद्देश नक्की काय झाले याचा आढावा घेणे व भविष्यात तसे होऊ नये यासाठी धोरण आखणे. TRC ने हे काम करण्यासाठी ६ वर्षे घेतली, या शाळांमधून बाहेर पडलेल्या व जिवंत असणाऱ्या लोकांच्या मुलाखती घेतल्या. कॅनडाच्या विविध भागात जाऊन साक्षीदारांच्या साक्षी नोंदवल्या. सुमारे ७० हजार अशा

माजी विद्यार्थ्यांपैकी सुमारे ३८ हजारांनी आपला लैंगिक छळ झाल्याचे नमूद केले.

TRC चा बहुतेक खर्च सरकारने व चर्चने उचलला. त्यातही दरम्यान कॅनडात केंद्र सरकार हुजूर पक्षाचे असताना त्याने हातभार उचलायला नकार दिला. TRC च्या त्यावेळच्या आकडेवारीप्रमाणे सुमारे ३ ते ४००० मुले शाळेत असतानाच गायब झाली, म्हणजे, मरण पावली. शिक्षणसुविधा या शाळांमध्ये कमी प्रतीची होती. त्यामुळे शाळा बंद झाल्यावर जी मुले दुसऱ्या शाळांत गेली, तेथे ती शिक्षणक्रम पूर्ण करू शकली नाहीत. म्हणजे, समाजात मिसळून जाण्याऐवजी ती आणखीच परिघावर फेकली गेली. TRC ने अनेक शिफारसी केल्या, त्यातील काही कागदोपत्री अमलात आल्या.

सुरुवातीला उल्लेख केलेल्या नवीन उत्खननामुळे शाळांच्या १२० वर्षांत किती अत्याचार झाले असावेत हे कल्पनातीत आहे. आजवरच हा आकडा हजारावर गेला आहे. [अधिक आधीचे ३-४००० - TRC]. काहींच्या अंदाजानुसार खरा आकडा दहा हजारावर असावा.

या प्रकरणाच्या चौकशीसाठी सरकारी हस्तक्षेप नसणारी स्वायत्त संघटना नेमावी अशी मागणी पुढे येत आहे.

या प्रकरणाचे प्रतिसाद जगभर उमटत आहेत. अमेरिकेतही अशा प्रकारच्या शाळा शतकाहून अधिक काळ होत्या. तेथेही उद्देश त्या लोकांचे सामाजिक अभिसरण 'योग्य' व्हावे हा होता. आता तेथेही आदिम मुले पुरली गेली का हा शोध त्या शाळांतून चालू झाला आहे.

**निरीक्षण**

स्वायत्ततेची आदिम लोकांची मागणी अनेक वर्षे आहे. तिला हा दुर्दैवी दुजोरा आहे.

हा उघड वंशच्छेद होतो. तो अक्षम्य सामूहिक मानवी गुन्हा आहे. त्याबाबत कॅनडाच्या आजी व माजी पंतप्रधानांनी माफी मागितली आहे. रोमन कॅथॉलिक चर्चचा सर्वोच्च धर्मगुरू पोप याने माफी मागावी अशी आता मागणी आहे.

गोऱ्या कॅनेडिअन्सचा आदिम लोकांकडे बघण्याचा, त्यांना वागणूक देण्याचा दृष्टिकोन बदलणे हे अशा घटनांना खरे उत्तर आहे. जाहीर माफीने परिस्थिती बदलत नाही. हा दृष्टिकोनातील बदल, कोणतेही धोरण कागदावर आले, तरी नजीकच्या भविष्यात होणे नाही. हे प्रकरण आपल्या इतिहासातील 'काळे पान' आहे असे म्हणणे म्हणजे विद्यमान वंशद्वेषाकडे दुर्लक्ष करणे आहे. खरा मुद्दा तो आहे.

अधिक खोलात जाता, माणसाच्या मूलभूत पाशवी वृत्तीला संस्थात्मक पाठिंबा असला की माणूस काय नीचतम पातळीपर्यंत जातो, हे दिसत आहे. मग ती संस्था धर्म असो, धार्मिक शाळा असो किंवा राजकीय संघटना असो. हे वर्तन आक्षेपार्ह वाटणारे कर्मचारी या शाळांमध्ये असणारच. [झाला असल्यास] त्यांचा निषेध अगदीच अपुरा पडला हेही उघड आहे. मानवी वृत्तीची मजल व मर्यादा या प्रकरणावरून दिसते. 'पूर्वग्रह' हा प्रश्नाचा सुलभ व उथळ खुलासा आहे, उत्तर नाही.

**दक्षिण आफ्रिका**

नेल्सन मंडेला २७ वर्षे तुरुंगवास भोगून राष्ट्राध्यक्ष झाले तर जेकब झुमा हा अलीकडचा राष्ट्राध्यक्ष ते पद १० वर्षे भोगल्यानंतर आता तुरुंगात गेला आहे. द. आफ्रिका देशाचे व लोकशाहीचे हे मोठेच अपयश आहे.

दक्षिण आफ्रिकेच्या वर्णद्वेषी गोऱ्या राजवटीविरुद्धच्या मंडेलांच्या लढ्यात झुमा सहभागी होता. पण सत्ता भ्रष्ट करते आणि सर्वंकष सत्ता संपूर्णपणे भ्रष्ट करते या वचनाचे तो उदाहरण झाला आहे.

आफ्रिकन नॅशनल काँग्रेस [ANC] हा दक्षिण आफ्रिकेतील सत्ताधारी पक्ष. १९९४ ला गोरी राजवट संपून मंडेलांची राजवट सुरू झाली. तेव्हापासून हाच पक्ष सत्तेवर आहे. पण त्याचे मताधिक्य प्रत्येक निवडणुकीत कमी होत आहे. २००८च्या निवडणुकीत झुमा राष्ट्राध्यक्ष झाला. तो २०१८ पर्यंत. मात्र स्वातंत्र्यलढ्यातील पुण्याई त्याने कारकीर्दीत संपुष्टात आणली.

**झुमाचा भ्रष्टाचार**

याचे प्रमुख कारण म्हणजे झुमाचा भ्रष्टाचार. १९९९पासून अनेक सरकारी कंत्राटात, विशेषत: संरक्षण खात्याच्या शस्त्रास्त्रे खरेदीत अब्जावधी डॉलर्सचा भ्रष्टाचार झाला. त्यात त्याचा हात होता. २००४ पासून त्याच्या भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे कोर्टात येऊ लागली.मंडेलांच्या नंतर थाबो एमबेकी राष्ट्राध्यक्ष झाला. तेव्हा झुमा उपाध्यक्ष होता. एका भ्रष्टाचार प्रकरणात त्याच्या एका साथीदाराला १५ वर्षे तुरुंगवासही झाला. मग त्याला उपाध्यक्ष पदावरून २००५ साली हटवण्यात आले.

नंतर आर्थिक गैरव्यवहाराच्या त्याच्या अनेक प्रकरणांनी ANC ने झुमाला २०१७ ला पक्षाध्यक्षपद सोडायला

भाग पाडले. २०१८च्या फेब्रुवारीत त्याने राष्ट्राध्यक्षपदाचा राजीनामा दिला. त्याच मार्चमध्ये त्याच्यावर भ्रष्टाचाराचे १८ आरोप आहेत आणि त्याचे नाव ७०० हून अधिक फसवाफसवी व काळ्या पैशाच्या व्यवहारात अडकले आहे असे देशाच्या Public Prosecutor ने जाहीर केले. २०२० ला शस्त्रास्त्रे बनवणारी एक फ्रेंच कंपनी व झुमा यांच्या गैरव्यवहाराची चौकशी करावी असा आदेश कोर्टाने दिला. ही सर्व प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत.

अध्यक्षीय कारकीर्दीत तेथील भारतीय वंशाच्या तीन गुप्ता बंधूंशी झुमाचे जवळचे संबंध होते. खाणी, ऊर्जा, रेल्वे अशा अनेक क्षेत्रात त्यांची गुंतवणूक होती. 'झुप्तां'ना हाकला [झुमा अधिक गुप्ता] अशी घोषणाही पुढे आली. ते त्याचे वैयक्तिक भ्रष्टाचार तर हाताळत असतच पण केंद्रीय मंत्रिमंडळात कोणाची वर्णी लावावी याबाबतही महत्त्वाचे निर्णय घेत. २०१८ला झुमाच्या पदच्युतीनंतर ते दुबईला पळून गेले.

दरम्यान कोर्टाने वारंवार समन्स बजावूनही झुमा कोर्टापुढे आला नाही. कोर्टाचा अवमान केल्याबद्दल त्याला १५ महिन्यांची तुरुंगवासाची सजा देण्यात आली.ती जुलैमध्ये सुरू झाली आहे. पण त्याच्या पाठीराख्यांची संख्या मोठी आहे. विशेषत: त्याच्या झुलू जमातीची. ते पूर्वीपासूनच त्याच्यावरचे आरोप खोटे आहेत, राजकीय आहेत, असा दावा करत आले आहेत. त्यांनी या तुरुंगवासाच्या शिक्षेविरुद्ध आता देशभर दंगली सुरू केल्या आहेत. त्यात गुप्ता पर्वामुळे भारतीयांनाही लक्ष्य करण्यात येत आहे. प्रचंड जाळपोळ, सार्वजनिक व खासगी मालमत्तेची नासधूस होत आहे. आजवर त्यात ३०० हून अधिक लोक मरणही पावले आहेत. देशात काही भागात सैन्य तैनात करावे लागले आहे.

लेखाच्या सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे हे लोकशाहीचे अपयश आहे. असा भ्रष्ट माणूस लोकशाही मार्गाने पक्षाध्यक्ष होतो, राष्ट्राध्यक्ष होतो हे एक अपयश. तेही त्या देशासारख्या कोवळ्या लोकशाहीत. दुसरे अपयश म्हणजे, न्यायसंस्थेवरचा त्याच्या पाठीराख्यांचा अविश्वास. त्यामुळे अटकेविरुद्ध हिंसाचार. वर्ण-द्वेषाच्या काळानंतर प्रथमच त्या प्रमाणात हिंसाचार चालू आहे. एकूण झुमा खंड [ट्रम्पसारखाच] लोकशाहीच्या अर्थाविषयी, श्रेयस्करतेविषयी व परिणामकारकतेविषयी संदेह निर्माण करतो.

purandarearts.com
art-non-deco.com
artnondeco@yahoo.co.uk